Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
VOL- VII ISSUE- II FEBRUARY 2020 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 6.293 ISSN 2349-638x

# मराठवाड्यातील बालरंगभूमी : एक अभ्यास

**श्री. सय्यद अमजद अब्दुल वाहेद**
संशोधक विद्यार्थी

**डॉ. संजय पाटील देवळानकर**
संशोधक मार्गदर्शक
नाट्यशास्त्र विभाग प्रमुख,
के.एस.के. महाविद्यालय,बीड

**प्रस्तावना :**

**नाना भावोरसंपन्न नानावस्थान्तरत्यकम् ।**
**लोक वृत्तानुकरणं नात्यमेतन्मयाकृतम ।।**

''नाटक हे मानवी जीवनाच्या निरनिराळ्या अवस्थांचे घटना-प्रसंगाचे भाव-भावनांचे आणि वृत्ती-प्रवृत्तीचे चित्रण आहे. या सर्व मानवी जीवनाशी संबंधित असल्याचे घटना गुणभावादी आंदोलने अभिनयाच्या माध्यमाद्वारे लोकांच्या पुढे प्रकट करणे म्हणजे नाटक.'' भरतमुनींनी अशा प्रकारे नाटकाची व्याख्या केली आहे.

नाटक या कलाप्रकाराचा 'कला' आणि 'वाङ्मय' प्रकारांनी विचार केला जातो. पारंपारीक, पारिभाषिक संज्ञाच्या परिभाषेत बोलायचे झाल्यास नाटकाचा विचार 'दृश्य काव्य' आणि 'श्राव्यकाव्य' या दोन्ही दृष्टिने केला जातो.

नाटक आणि रंगभूमी या दोन संकल्पनांचा तसेच त्यांच्या स्वरुपाचा विस्तार विकासाचा विचार भिन्नपणे करणे शक्य आहे. परंतू ज्यावेळी आपण मराठी नाटक आणि मराठी रंगभूमी असे शब्दप्रयोग करुन त्यांच्या परंपरांचा शोध घ्यायला लागतो, तेंव्हा असे ध्यानात येते की, यातल्या एका प्रवाहाचा विचार करतांना अपरिहार्यपणे दुस-या प्रवाहाचा विचार करावाचा लागतो कारण या दोन्ही गोष्टी परस्पराश्रयी आहेत. कोणत्याही लिखित नाटकाची पूर्णता किंवा परिणती ही रंगमंचावरील प्रयोगातच होत असतो. याचा आणखी एक अर्थ स्पष्ट आहे की, नाटक कोणत्याही प्रकारचे असो, ते लिहीतांना नाटककाराला रंगभूमी माध्यमाचे भान असायला हवे. कारण नाटक हे प्रयोगसापेक्ष असते. म्हणजेच नाट्यलेखनाचा किंवा नाट्यवाड्मयाचा अभ्यास करतांना रंगभूमीच्या संकल्पनेचा तत्कालीन परिस्थितीचा विचार करणे अगत्याचे असते. मराठी रंगभमी बाबत तर चित्र असे दिसते की, या परंपरेत कधी नाटककार, कधी नटवर्ग, कधी प्रेक्षक तर कधी बाह्य परिस्थितीतील सामाजिक, राजकीय, कलाक्षेत्रातील घटना कमी जास्त प्रमाणात वरचढ झालेल्या आहेत असे असले तरी दोन्हीचे वेगळेपण कायम राखून त्यांच्या समन्वयाचाही विचार अनुक्रमाने करावा लागतो. म्हणजेच नाटक आणि रंगभूमी यांचा ऐकत्रित विचार करावा लागतो.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

१) मराठवाड्यातील बालरंगभूमीचा अभ्यास करणे.

२) मराठवाड्यातील बालनाट्य नाटककारांची माहिती मिळवणे.

**रंगभूमीचा इतिहास आणि वर्तमान :**

मराठी रंगभूमीची सुरुवात १८४३ साली असे म्हटलं जाते. तेंव्हापासून मराठी रंगभूमीसाठी भरपूर लेखन झाले मुख्यत: हे लेखन एकाच प्रवाहात किंवा प्रवृत्तीत अडकून राहिले नाही. संख्यात्मक आणि गुणात्मक अशा दोन्हीही स्तरांवर ते विपूल प्रमाणात होत राहिलेले आहे. प्रायोगिक सोबतच व्यावसायिक नाट्यलेखनाची मुख्यधारा कायम राहिली. बालरंगभूमीच्या प्रवाहानेही इतिहासात लक्षवेधक काम केले आहे. बालकांसाठी जाणीवेने नाटके लिहिल्या गेलीत.

स्वातंत्र्योत्तर कालखंडात जे नाट्यप्रवाह नव्या जाणिवेने निर्माण झाले, विस्तारीत आणि विकसीत झाले त्यामध्ये बालनाट्य बालरंगभूमी हा एक महत्त्वपूर्ण प्रवाह आहे. या बालरंगभूमीला सोनेरी दिवस आणण्यासाठी रत्नाकर मतकरी, सई परांजपे, सुधा करमरकर, सुलभा देशपांडे, लिला भागवत, माधव वझे, प्रतिभा मतकरी, प्रकाश पारखी, देवदत्त पाठक इ. अनेकांनी प्रयत्न केले. प्रादेशिक पातळीवरही विदर्भ, खान्देश, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्रातही बालरंगभूमी चळवळ जोमाने उभी झालेली दिसते.

गेल्या दहा वर्षापासून मी बालरंगभूमीवर कार्य करीत आहे. मराठवाड्याची भौगोलिक, सांस्कृतीक, सामाजिक, आर्थिक घटकांचा विचार केला असता या ठिकाणी बालरंगभूमीला एक स्वतंत्र अस्तित्त्व आहे असे जाणवले. आज त्याची स्वतःची चळवळीतून झालेली प्रगत अवस्था आहे. पण दुर्दैवाने त्यावर फारसे संशोधन झालेले दिसत नाही. प्रस्तुत संशोधनाद्वारे मराठवाड्यातील बालरंगभूमीचा समग्र शोध घेवून त्याचे स्वरुप, व्याप्ती आणि विकास तसेच आजचे स्वरुप यावर लक्ष केंद्रीत केले जाई. तसेच या रंगभूमीसाठी कार्य करणारे लेखक, दिग्दर्शक, तंत्रज्ञ संस्था त्यांची ओळख व्हावी, त्यांच्या कार्य तंत्रशैलीचा अभ्यास व्हावा अशी प्रामाणिक भूमिका, या संशोधनासाठी मी स्वीकारणार आहे.

**बालरंगभूमीचा इतिहास :**

एखादा कलाप्रकार प्रवाहरुपाने निर्माण होण्यासाठी आरंभ काळात व्यक्ती दूरदृष्टिच्या असाव्या लागतात. प्रवाहातील वैशिष्ट्यांचा वृत्तींचा प्रचार, प्रसार व्हावा लागतो, विस्तार आणि विकास व्हावा लागतो. बालनाटक आणि बालरंगभूमी यांच्या संदर्भात यातल्या काही गोष्टी प्रकर्षाने घडल्या. प्रौढांबरोबरच लहानांसाठी काही नाट्यलेख करावे, असे स्वातंत्र्यपूर्व काळात फारच क्वचीत लेखकांच्या ध्यानात आलेले दिसते. तसे तुरळक प्रयत्न झालेले आहेत. उदाहरणार्थ छत्रे यांनी लिहीलेले ''बालसंवाद', राम गणेश गडकरी यांनी लिहीलेले 'सकाळचा अभ्यास', 'दोन चुटके', प्रल्हाद केशव अत्रे यांचे 'गुरुदक्षिणा', 'वीर वचन' नानासाहेब शिरगोपीकर यांचे 'गोकुळचा चोर', 'सिंहगडचा शिलेदार', 'बालशिवाजी' वा.गो.आमटे यांची 'नाट्यरामायण', 'नाट्यभारत' इत्यादी. या व्यतिरिक्त स.अ.शुक्ल, ना.धो.ताम्हणकर, वि.द.घाटे आदी लेखकांनीही लहान मुलांसाठी नाट्यरुप लेखन केलेले आहे. इंग्रजी भाषेतील परिकथा, अद्भूतरम्य कथा, आपल्याकडील बालनाट्य लेखनाला प्रेरणा देणा-या ठरल्या. जे विश्व मुलांच्या कल्पनेमध्ये असे किंवा काही वेळा कल्पनेपलिकडचे असते, ज्यामध्ये त्यांना रममाण होणे आवडते, ते या इंग्रजी बालनाट्यांचा संदर्भात होते. या पध्दतीचे नाट्यलेखन आपण करावे आणि मोठयांप्रमाणेच लहानांसाठी रंगभूमी हे माध्यम वापरले जावे ही त्या मागची भूमिका होती. ती जाणतेपणाची होती, ही जाण १९५० नंतरच्या दशकात निर्माण झाली. पहिल्या काळात जे काही बालनाटके लिहीली गेली त्यामध्ये 'हेमा आणि सात बुटके', 'हरवलेला पैंजण' (भालचंद्र भिडे) 'जादूचा वेल' (सुधा करमरकर), 'मधुमंजिरी', 'पत्ते नगरीत', 'झाली काय गंमत', 'शेपटीचा शाप' (सई परांजपे), 'प-यांची राणी', 'संगीत चंद्राचे वरदान' (मालती दांडेकर), 'सोनपरी', 'चांदपरी' (अनंत काणेकर) 'बयं मोठं खोटं', 'नवे गोकुळ' (पु.ल.देशपांडे) या नाट्यकतीचा आवर्जुन उल्लेख करावा लागतो.

अद्भूतरम्यतेच्या बालनाट्यलेखनाच्या काळात आगेमागे अन्य विषयांवरचे नाट्यलेखन घडतच होते. पण ज्यांनी या नाट्यलेखन -प्रवाहाला दिशा देण्याचा सशक्त पयत्न केला अशांमध्ये रत्नाकर मतकरी, विजय तेंडूलकर, सई परांजपे, पु.ल.देशपांडे ही नावे विशेष आहेत. त्यांच्या लेखनकार्यामुळे बालरंगभूमीची बालनाट्याची चळवळ निर्माण होण्यास, विस्तारीत होण्यास मदत झाली आहे.

**संशोधनाची गरज :**

रत्नाकर मतकरी, सुधा करमरकर यांनी हौशी व्यावसायिक स्तरावर नाट्यलेखन - प्रयोगनिर्मिती करुन बाल रंगभूमीची चळवळ सर्वदूर नेण्याचा जाणता प्रयत्न केला. त्याच पध्दतीने मराठवाड्यात हौशी व शालय रंगभीवर नाट्यलेखन प्रयोगनिर्मिती करणारी मंडळींची संख्या काही कमी नाही.

मराठवाडा जशी संतांची भूमी आहे. तशी कलावंताची नाट्यकर्मीचीही भूमी आहे. मराठवाड्यातील नाट्य चळवळीचा प्रारंभ जवळजवळ ७५ वर्षापुर्वी झाला. पण ही चळवळ गेल्या २० वर्षापासून अत्यंत वेगाने पसरत आहे. रा.र.बोराडे, दत्ता भगत, प्रा.अजीत दळवी, प्रशांत दळवी, अरविंद जगताप इत्यादी नाटककारांनी मराठवाड्यातील नाट्य चळवळींचा स्वर्णकाळ नसला तरी रौप्य काळाकडे वाटचाल करणारा काळ निर्माण केला व पुणे-मुंबई मराठी रंगभूमीच्या पंढरीत मराठवाडी लेखकांच्या नाट्य साहित्याला ख-या अर्थाने मानाचे स्थान मिळवून दिले.

ज्या प्रमाणे समाजात मोठ्यांच्या तुलनेत लहान मुलांना गौण स्थान आहे. तसेच काही बालरंगभूमी बाबतीत ही झाले. मराठवाड्यातील प्रायोगिक रंगभूमी, हौशी रंगभूमी, व्यावसायिक रंगभूमीच्या दृष्टिने यशस्वी झाली. बालरंगभूमीच्या संदर्भात, अनेक बालनाट्य नाटककारांनी बालनाट्य लेखन करुन बालरंगभूमी/शालेय रंगभूमीची चळवळ चावली अशा या मराठवाड्यातील बालनाट्य नाटककारांचा प्रयोग करणा-या संस्थांचा, दिग्दर्शकांचा शोध घेणे महत्त्वाचे ठरते.

नाट्य संमेलन, व्याख्याने, चर्चासत्राच्या निमित्ताने बालरंगभूमी विषयी नेहमी चिंता व्यक्त केली जाते. पण त्याचे चिंतन करुन, बालरंगभूमीचा अभ्यास करुन प्रादेशीक बालनाट्य नाटककारांचा शोध घेऊन त्यांनी लिहीलेल्या बालनाट्याची नोंद व प्रयोगांची दखल घेण्याच गरज आहे. बालरंगभूमी ही फक्त मुंबई-पुणे किंवा तत्सम मोठ्या शहरापुरती मर्यादीत नसून ती ग्रामीण भागातही फोपावली आहे. ती त्या त्या भागातील बालनाट्य लेखकांमुळेच. अशा या बालरंगभूमीच्या दृष्टिने नव्हे तर मराठी रंगभूमीची जडणघडण व चळवळीच्या दृष्टिनेही दुर्लक्षीत राहिलेल्या मराठवाड्यातील बालरंगभूमीची संख्यात्मक, गुणात्मक या दोन्ही स्तरांवर चर्चा व्हावी. मराठी बालरंगभूमीच्या दृष्टिने त्याच्या नाटकांतील भाषा, प्रयोगशीलता, नवीनता, समजावून घेतले तर बालरंगभूमी वृंदीगत करण्यास मदत होईल हे निश्चितच.

**विषयाचे महत्त्व :**

नाटक जीवनाचे अभिरुचीपूर्ण प्रतिबिंब किंवा जीवनाचा कलात्मक आभास आहे. मनोरंजन आणि शिक्षणाचे ते एक प्रभावी माध्यम आहे. बालप्रेक्षकांचे मनोरंजन करता करताच त्यांचे व्यक्तिमत्त्व घडवण्याचा प्रयत्न नाट्य माध्यमातून करणे हा बालप्रेक्षकांचे कल्पनाविश्व, त्यांची मानसिक भूक, बौध्दिक अवाका, यांच्या वेगळेपणा लक्षात घेवून त्यांच्यासाठी लिहीलेली खास नाटके सादर करण्यासाठी बालरंगभूमी उदयाला आली. मुलांचे रंजन करता करताच ही रंगभूमी इतरही अनेक उद्दिष्टे पार

*पाडते. रोजच्या जीवनातील अनुभवापेक्षा वेगळे अनुभव व ते अनुभवणा-या व्यक्तींचे अवलोकन करावयास प्रेक्षक-मुलांना संधी मिळते. तसेच बालकांच्या मनोवस्थेचे दर्शन घडण्यास मदत होते. बालविश्वाची सर्वकष मुशाफिरी बालरंगभूमी करविते.*

*''शालेय शिक्षणात नाट्याला अलीकडे वाढते महत्त्व मिळू लागले आहे. ही आनंदाची गोष्ट आहे. परंतू अवघड, क्लिष्ट किंवा अप्रिय असे विषय मुलांच्या गळी शक्य तेवढ्या सहजपणे उतरावे म्हणून नाट्य आज राबवले जात आहे. तेवढेच त्याचे महत्त्व नव्हते. मुलांमधल्या उपजत नावाच्या विकासाच्या गतीशी त्याच्या मानसिक आणि बौध्दिक व काही प्रमाणात शारीरिक विकासाचा अपरिहार्य संबंध असतो. या उपजत नात्याकडे दुर्लक्ष करुन, मुलाला त्या बाबतीत नाउमेद करुन निव्वळ पुस्तकी ज्ञानाला त्याला जुंपून आपण त्याचे सर्वांगिण विकास करतो. वास्तविक उपजात नाट्यकलेचे पध्दतशीर वळण आणि उत्तेजन दिले तर मुले आपोआप जिज्ञासू, कल्पक आणि ज्ञानाचे भुकेले होत जातात. शरीर-मनाने ते चांगले बाळसे धरतात''. (चिमणा बांधतो बंगला प्रस्तावनेवरुन). विजय तेंडूलकरांच्या उपरोक्त विधानावरुन आपणास लक्षात येते की, विद्यार्थ्यांचे मनोरंजन सोबतच त्यांच्या वर्तनात सुयोग्य बदल होऊन त्यामुळे त्यांचे व्यक्तिमत्त्व घडायला मदत मिळते.*

***निष्कर्ष :***

*जागतिकीकरणाच्या या कालखंडात त्याच्या परिणाम हा शालेय शिक्षणावरही होत आहे. विद्यार्थ्यात होणारा बदल हा आधुनिकतेचा पाश्चिमात्य अनुकरण आणि विभक्त कुटुंबाचा याच्यामुळे होत आहे. आपण दिलेले उपदेश त्यांना रटाळवाने वाटतात. तेंव्हा नाटकाद्वारे त्यांच्यामध्ये अमुलाग्र बदल घडवून आणला जाऊ शकतो. नाटक ही संयुक्त कला आहे. ज्यात अभिनय, संगीत, नृत्य, गायन इत्यादी कला एकत्रीत होतात. नाटकाचा दृक आणि श्राव्य असा दुहेरी परिणाम साधता येणं शक्य असल्यामुळे मुलांवर अनेक संस्कार करण्याचे सामर्थ्य या माध्यमामध्ये आहे. एकीकडे प्रसारमाध्यमांची बजबजपुरी काढली असताना, नाट्यमाध्यम बाळविश्वाचे संरक्षण माध्यम म्हणून उपयुक्त ठरु शकते. वरील सर्व गोष्टींचा अभ्यास केला असता, बालनाट्यातील सामर्थ्य समजून घेण्यासाठी मराठवाड्यातील बालरंगभूमीचा अभ्यास करणे अतिशय महत्त्वाचे आहे.*

***संदर्भ :***

*१.वाड़मयीन दृष्टी आणि दृष्टिकोन-प्रा.वा.ल.कुलकर्णी, प्रकाशक भ.रा.भटकल, १९५९.*
*२. ऐतिहासिक मराठी नाटके-डॉ.भीमराव कुलकर्णी प्रकाशन : जोशी, लोखंडे, १९७१*
*३. वाड़मयीन मते आणि मतभेद- प्रा.वा.ल.कुलकर्णी, प्रकाशन : के.भि.ढवळे, १९४९*
*४. एकांकिका - वाटचाल, संपादक - प्रा.श्री.र.भिडे व प्रा.व.दि.कुलकर्णी प्रकाशक : ग.ना.नेवाळकर, १९६९*

ISSN 2349-638X
www aiirjournal.com